ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, ३ फेब्रुवारी, १९७१ | अंक ३

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्टयामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि; उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २

STUSA 735

# युनायटेड वेस्टर्न बँकेची सर्वांगीण प्रगती

## शाखा ५०; ठेवी रु. १४ कोटींचेवर

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने १९७० सालात स्पृहणीय अशी प्रगती केली असून ऑडिटपूर्व ताळेबंदानुसार दि. ३१–१२–१९७० अखेर बँकेच्या ठेवी रु. १४·०१ कोटी झाल्या आहेत. या वर्षात बँकेच्या ठेवींत रु. २·०५ कोटींची वाढ झालेली आहे. बँकेने गेल्या वर्षी इतकेच म्हणजे साडेनऊ टक्क्यांप्रमाणे डिव्हिडंड भागधारकांना द्यावयाचे ठरविले आहे. बँकेच्या नफ्यातही रु. ९८,००० ची म्हणजे २६ टक्क्यांची वाढ होऊन तो रु. ४·६५ लाख झाला आहे. राखीव निधीकडे बँकेने रु. १·५० लाख ( स. १९६९ : रु. १ लाख ) वर्ग केले असून आता एकूण राखीव निधी वसूल भांडवलाइतका झालेला आहे, ही विशेष प्रगतीची बाब होय. बँकेच्या सेवक वर्गासही बँकेने सन १९७० करिता गेल्या वर्षापेक्षा एक टक्का जास्त म्हणजे ८ टक्के बोनस जाहीर केलेला आहे.

वर्षअखेर बँकेचे वसूल भांडवल रु. १३·१० लाख असून गुंतवणूक रु. ३·५७ कोटींचेवर गेली आहे. तसेच कर्ज-व्यवहारातही खूपच म्हणजे रु. १·५१ कोटींची वाढ झालेली असून तो रु. ९·४४ कोटींचेवर गेला आहे.

बँकेने सन १९७० मध्ये आपली सुवर्णमहोत्सवी ५० वी शाखा नांदेड येथे उघडून प्रगतीचा एक मोठा टप्पा गाठला आहे. ठाणे, तळेगाव ( ढमढेरे ), गोरेगाव ( जिल्हा–कुलाबा ), चिपळूण, लातूर, चोपडा व नांदेड अशा एकूण ७ ठिकाणी बँकेने आपल्या नवीन शाखा १९७० मध्ये उघडल्या असून वर्षअखेर तिच्या एकूण ५० शाखा झालेल्या आहेत. आता पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत बँकेच्या शाखा असून मराठवाड्यातही तीन जिल्ह्यांत तिच्या शाखा आहेत.

सन १९७० मधील बँकेची ही प्रगती अभिमानास्पद अशीच आहे. बँकेचा सेवकवर्ग, संचालक मंडळ व चेअरमन, श्री. वि. श्री. दामले यांचे या प्रगतीबद्दल अभिनंदन होत आहे.

---


लहानमोठे कारखानदार व व्यापारी यांना मालाची जाहिरात व विक्री करण्याची सुसंधी

**८ वे पुणे औद्योगिक प्रदर्शन**

दिनांक १८ फेब्रुवारी ते दिनांक १४ मार्च १९७१

स्टॉल्स व शोकेसेसची नोंदणी चालू आहे.

आजच समक्ष भेटून आपल्या स्टॉल किंवा शोकेसेसची निवड करा.

महात्मा फुले वस्तु-संग्रहालय, घोले रस्ता, पुणे.


**एम. सी. सी. ला ३६ लक्ष रु. मिळणार ?** — गेल्या वर्षीचा दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघाचा इंग्लंडचा दौरा त्या वेळेच्या ब्रिटिश सरकारच्या सूचनेवरून एम. सी. सी. ह्या इंग्लंडमधील क्रिकेटच्या नियंत्रण संस्थेने रद्द केली. त्यामुळे झालेले ३६ लक्ष रु. चे नुकसान भरून मिळावे, अशी एम. सी. सी. ने ब्रिटिश सरकारकडे मागणी केली आहे. ती बहुधा मान्य होईल. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णभेदाच्या धोरणाच्या निषेधार्थ क्रिकेट सामने उधळून लावण्याची धमकी देण्यात आली होती, त्याच्या भीतीने सामने रद्द करावे लागले होते.

**खादीच्या जागी खाकी कापड** — म्हैसूर राज्य सरकारच्या काही प्रकारच्या नोकरांना ह्यापुढे खादीच्या गणवेशाऐवजी खाकी कापडाचे गणवेश देण्यात येतील. पांढऱ्या टोपीची जागा खाकी टोपी घेईल.

**चिनी तज्ज्ञ सिलोनच्या चहाच्या मळ्यात** — सध्या चिनी चहाचा उत्तर आफ्रिकेत आणि पश्चिम आशियात पुष्कळ खप होतो. परंतु, चहाऐवजी इतर मालाची निर्गत करून सिलोनला चहाची ही बाजारपेठ देण्याचा चीनचा विचार आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून चिनी चहातज्ज्ञ सिलोनमधील चहाच्या मळ्यांची पाहणी करीत आहेत.

**ग्रेट ब्रिटनमध्ये दशमान नाण्यास प्रारंभ**—ग्रेट ब्रिटन-मधील बँका फेब्रुवारीच्या मध्यास चार दिवस ( ११ ते १४ फेब्रुवारी ) गिऱ्हाइकांना बंद राहतील. त्या काळात, १४,५०० बँकाकचेऱ्यांतील सर्व हिशेब दशमान चलनात आणले जातील. १५ फेब्रुवारीपासून सर्व चेक पौंड आणि नवे पेन्स ह्यातच लिहिले पाहिजेत. सध्या २४० पेन्सचा एक पौंड होतो; ह्यापुढे १०० पेन्सचा एक पौंड होईल. दक्षिण वेल्समधील सरकारी टांकसाळी-मधील सुमारे ३०,००० टन वजनाची ब्राँझची नाणी खास विमानाने ग्रेट ब्रिटनच्या सर्व भागांना पुरविली जातील.

**दिल्लीमधील सातवे इंग्रजी दैनिक**— दिल्लीमध्ये " दि मदरलँड " ह्या नावाचे नवे इंग्रजी दैनिक ५ फेब्रुवारी-पासून सुरू होत आहे. श्री. डी. आर. मणकेकर त्याचे कार्यकारी संपादक असतील.

**जॅकी केनेडी चित्रपटतारका होणार**—अमेरिकेच्या माजी अध्यक्षांची विधवा जॅकी केनेडी ( आता सौ. जॅकलिन ओनॅसिस ) दोन चित्रपटांत प्रमुख भूमिका करणार आहे.

**नव्या चार्टर्ड अकौंटंटसना वाव**—नव्या चार्टर्ड अकौंटंट्सना वाव मिळावा, ह्यासाठी ज्या फर्म्समध्ये सात किंवा सातापेक्षा कमी लोक आहेत, अशा फर्म्सनी ७५० रु. पेक्षा कमी ऑडिट फी घेऊ नये, १५ किंवा त्यापेक्षा जास्त लोक कामाला असणाऱ्या फर्म्सनी १,५०० रु. पेक्षा कमी ऑडिट फी घेऊ नये, असे इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटसच्या कौन्सिलने ठरविले आहे. अर्थात या ठरावाचे स्वरूप शिफारसवजा आहे. धर्मादाय संस्था आणि नव्या कंपन्या ह्यांच्या हिशेबतपासणीस ही शिफारस लागू नाही.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ फेब्रुवारी, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## पाकिस्तानमधील बँकांची धावपळ

पाकिस्तानमधील सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर पूर्व पाकिस्तानात शेख मजिबूर रहमान आणि पश्चिम पाकिस्तानात झुल्फिकारअली भुट्टो ह्यांच्या पक्षांना लोकांचा भरघोस पाठिंबा असल्याचे आढळून आले. हे दोन्ही पुढारी डाव्या विचारसरणीचा म्हणजे रूढार्थाने समाजवादाचा पाठपुरावा करतात. कशाही स्वरूपाच्या समाजवादी व्यवस्थेत खाजगी मालकीच्या बँकांना प्रमुख स्थान मिळणे अशक्यच मानले जाते. त्यामुळे पाकिस्तानातील निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्याबरोबर बँकांच्या चालकांत फार मोठी खळबळ माजली होती. निवडणुकीच्या निकालाचा पहिला धसका ओसरल्यावर त्यांनी आता प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्याचे प्रयत्न चालविले आहेत. बऱ्याच मोठ्या बँका आपल्याजवळील पैसा छोट्या बँकांतून ठेवीत आहेत. कल्पना अशी आहे की छोट्या बँकांचे राष्ट्रीयीकरण सहसा करण्यात येणार नाही. दुसऱ्या काही बँकांनी सहकारी बँकांच्या मालिका काढण्यास प्रारंभ केला आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले तर सहकारी बँकांना त्यातून वगळण्यात येईल अशी आशा त्यांना वाटत आहे पाकिस्तानातील बड्या बँकांच्या धोरणाबद्दल तेथे बराच विरोध दिसून येतो. ह्या बँकांनी शेतीच्या विकासासाठी पूर्ण दुर्लक्ष केले असा आरोप त्यांच्यावर आहे. व्यापारी आणि उद्योगपती ह्यांनाच फक्त कर्जे देण्यात येतात अशीही तक्रार आहे. शिवाय त्याचा फायदा कराची, लाहोर व ढाका ह्यांसारख्या मोठ्या शहरांनाच मिळतो. त्यांच्याकडील ७५ टक्के ठेवी ह्या शहरांतून मिळालेल्या आहेत.

---

## मध्यावधी निवडणुकीला १५ कोटी रुपये खर्च

येत्या मार्च महिन्यात होणाऱ्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांसाठी भारत सरकारला १५ कोटी रुपये खर्च करावा लागणार आहे. १९६७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या खर्चापेक्षा हा खर्च २०० टक्क्यांनी अधिक आहे. ह्यापूर्वी झालेल्या निवडणुकांच्या वेळी भारत सरकारने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कचेरीत काम करणाऱ्या नौकर वर्गाला याव्या लागणाऱ्या वेतनापैकी निम्म्या वेतनाचा भार आपल्या शिरावर घेतला होता. त्याशिवाय मतदारांच्या याद्यांची दुरुस्ती व त्या तयार करण्याच्या खर्चातील निम्मा खर्चही मध्यवर्ती सरकारने केला होता. शिवाय मतदानाच्या पेट्यांची राखण आणि साठवण्यासाठी होणाऱ्या खर्चापैकी निम्मा लोकसभा आणि राज्यविधानसभा ह्यांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्यात येत असतील तर त्यातीलही निम्मा खर्च भारत सरकार सोशीत असे. परंतु ह्यावेळी एकदोन राज्ये सोडून लोकसभा व राज्यविधान सभा ह्यांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्यात येणार नाहीत. त्यामुळे निवडणुकीचा सर्वच खर्च मध्यवर्ती सरकारला करावा लागणार आहे. १९६७ साली झालेल्या निवडणुकांसाठी मतदारांच्या याद्या तयार करण्यासाठी आणि त्यांची दुरुस्ती करण्यासाठी सुमारे ३·५६ कोटी रुपये खर्च झाला होता. निवडणुका प्रत्यक्ष घेण्यासाठी आलेला खर्च सुमारे ७·११ कोटी रुपये होता. १९६२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी मतदारांच्या याद्यांसाठी झालेला खर्च सुमारे २·७२ कोटी रुपये आणि निवडणुका घेण्यासाठी आलेला खर्च सुमारे ५ कोटी रुपये होता. सरकारी नौकरांना निवडणुकीच्या कामासाठी देण्यात येणारा भत्ताही मध्यवर्ती सरकारच देत असते.

---

## ब्रिटिश मळा कंपनीची जादा जमीन नुकसानभरपाई न देता ताब्यात घेतली

केरळमधील सर्वात मोठ्या ब्रिटिश मालकीच्या मळ्यांची लागवड न केलेली १० हजार हेक्टर जमीन केरळ सरकारने नुकसानभरपाई न देता ताब्यात घेतली आहे. कंपनीचे नाव कानन् देवन् हिल प्रोडयूस कंपनी असे असून ती ब्रिटनमध्ये रजिष्टर झालेली आहे. कंपनीकडे सुमारे ८१,५८५ हेक्टर जमिनीची मालकी होती. ता. ११ जुलै १८७७ ह्या दिवशी ही जमीन कंपनीला बेमुदत भाडेपट्ट्याने देण्यात आली. दरसाल ३ हजार रुपये खंड ठरविण्यात आला. त्या वेळच्या त्रावणकोर सरकारने खास जाहिरनामा काढून जमीन कंपनीला भाडेपट्ट्याने देण्यास अनुमती दिली. सदर जमिनींपैकी १० हजार हेक्टर लागवडीखाली नसलेली जमीन काढून घेण्यासाठी वटहुकूम काढण्यात आला होता. त्यावर राष्ट्राध्यक्षांची सही झाल्यावर केरळ सरकारने जमीन ताब्यात घेतल्याची रितसर घोषणा केली. ह्यासंबंधी बोलताना केरळचे महसूल मंत्री म्हणाले की भारतात नुकसानभरपाई न देता सरकारने जमिनीचा ताबा घेतल्याचे हे पहिलेच उदाहरण असावे. खंडकऱ्यांकडून शेतीचा विकास करण्यासाठी जर सरकारने जमीन परत घेतली तर त्यासाठी नुकसान भरपाई देण्याची जरूर

नाही असे सरकारचे म्हणणे आहे. ही जमीन कंपनीने पड टाकलेली होती; अर्थातच, तिला जमिनीचा उपयोग नव्हता असा युक्तिवाद करता येण्यासारखा आहे. ह्या जमिनीवर एक शहर वसवून एक मोठे शेत तयार करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. कंपनीला देण्यात आलेली जमीन मूळ जॉन डॅनिअल मन्रो ह्या लंडनमधील गृहस्थाला दिलेली होती. त्यानेच वरील कंपनीची स्थापना केली होती.

---

### रोगापेक्षा त्यावरील उपायच घातक

असाध्य रोगाने पछाडलेला एखादा रोगी कंटाळतो आणि जादुटोण्यापासून ते भयंकर डागण्यापर्यंत अघोरी उपाय करून घेण्यासही तयार होतो. पण ही गोष्ट झाली मागासलेल्या लोकांची अगर देशांची. शास्त्रीय ज्ञानात अग्रेसर असलेले देशही एखाद्या विकट समस्येवर भलताच उपाय योजण्याची चूक करताना दिसतात, तेव्हा आश्चर्यच वाटल्याशिवाय राहात नाही. समुद्राचे पाणी बोटीतील घाण तेलामुळे दूषित झाले असल्याची जाणीव सर्व दर्यावर्दी देशांना झाली आहे. काही महिन्यांपूर्वी इंग्लंडच्या किनाऱ्यानजीक एक तेलवाहू बोट फुटून तेल समुद्रावर पसरले. त्या निमित्ताने दूषित पाण्याची समस्या विशेष जोराने पुढे आली इतकेच. समुद्र व किनारा ह्यावर तेलाचा भला थोरला तवंग पसरल्यामुळे जलांतर्गत प्राणी-जीवनाला मोठा धोका उत्पन्न झाला. कोट्यवधी मासे व पक्षी मृत्युमुखी पडले. पाण्यावर पसरलेल्या ह्या तेलाचा निचरा कसा करावा ह्याविषयी लंडनमध्ये अलीकडे एक परिसंवाद भरविण्यात आला होता. त्यात काही शास्त्रज्ञांनी तवंग नाहीसा करण्यासाठी काही रासायनिक द्रव्यांची शिफारस केली. त्याप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्यावर असे आढळून आले की ही नवी द्रव्ये जलचर जीवनास तेलापेक्षाही अधिक घातक आहेत. फ्रेंच शास्त्रज्ञांनी एक नवीन प्रकारचा पंप शोधून काढला होता. त्याचा उपयोग करून पाण्यावर पसरलेले तेल वेगळे काढता येत होते. खरोखर हा उपाय अधिक स्वस्त, कार्यक्षम आणि मोठ्या प्रमाणावर वापरता येण्यासारखा होता असे म्हणतात. पण कोणत्याही कारणाने असो, ह्या उपायाची उपेक्षा झाली.

---

### मुंबईतील नृत्य शिकविणाऱ्या शाळा

मुंबई शहरात पाश्चात्य पद्धतीचे नृत्य शिकविणाऱ्या शाळा अगर संस्था काढणे मोठा किफायतशीर धंदा झालेला दिसतो. अगदी अलीकडेपर्यंत म्हणजे सुमारे दोन वर्षांपूर्वी त्या अगदी थोड्या होत्या पण आता त्यांची संख्या २०० पर्यंत आली आहे. ह्या बाबतीतील जाणकारांची अशी पक्की समजूत आहे की ह्या बहुतेक संस्थांतून मजा लुटण्याचा धंदा चालविण्यात येतो. बहुतेक संस्थांच्या इमारतीमधून मौज करण्यासाठी आलेल्या गिऱ्हाइकांना स्वतंत्र खोल्या मिळू शकतात. कलेच्या नावाखाली अशा प्रकारच्या संस्था काढण्यावर काहीच बंधन नाही. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा परवाना घ्यावा लागत नाही. शहरातील पोलिस अधिकाऱ्यांनी सरकारला अशी सूचना केली आहे की ह्या संस्थांना परवाना घेण्याची सक्ती करावी आणि सार्वजनिक मनोरंजनाबाबतचा कायदा त्यांना लागू करण्यात यावा. अलीकडे पोलिसांनी अशा ३१ नृत्यशाळांवर धाडी घातल्या आणि १७ लोकांना अटक केली. एकाने गुन्ह्याचा कबुलीजबाब दिला व बाकीचे सर्व निर्दोष सुटले. त्यानंतर नृत्य शिकविणाऱ्या संस्था झपाट्याने वाढू लागल्या आहेत. त्यांतून शेकडो मुलींना नोकरीवर ठेवण्यात आलेले आहे. मुलींपैकी काहींच्या मुलाखती पत्रकारांनी घेतल्या. तेव्हा असे दिसून आले की त्या गरीब आणि मध्यम वर्गातून आलेल्या होत्या. त्यांना महिना ३५० रुपयापर्यंत पगार देण्यात येतो. नृत्यसंस्थांचा आणखीही एक उपयोग करून घेण्यात येतो. शहरातील कचेऱ्यांतून काम करणाऱ्या तरुणतरुणींची भेटण्याची जागा म्हणून त्या वापरल्या जातात. मधल्या सुटीत अगर फावल्या वेळी ते एकमेकांना येथे भेटतात.

---


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

येणेंसी या होऊनि एक । जें कर्म चाले सात्विक ॥
तें कैवल्याचे पाइक । घरींचे करी ॥ श्री ज्ञानेश्वरी

(१) साखरेचा नवीन हंगाम दि. २ ऑक्टोबर १९७० रोजी सुरू झाला असून, साखरेचे उत्पादन जोरात चालू आहे.
(२) डिस्टिलरी व्यवस्थित चालू असून, स्पिरिटचे उत्पादनही जोरात चालू आहे.
(३) कंपनीच्या भागीदारांची वार्षिक सभा दि. ३१-१२-७० रोजी होऊन ऑर्डिनरी शेअरवर करपात्र २० टक्के नफा मंजूर झाला आहे.

कंपनीची प्रगती व भरभराट होण्यासाठी भागीदार व ठेवीदार यांनी केलेल्या आर्थिक साहाय्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार व प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !
भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो !

शं. ल. लिमये,
बी. एस्सी., एलएल. बी.,
अध्यक्ष

## योगविद्येवर रशिअन चित्रपट

हिंदमधील योगविद्येसंबंधी एक चित्रपट तयार करण्यासाठी रशिआतील काही निर्माते भारतात आले होते. त्यांनी भारतात काही महिने फिरून ह्या विद्येसंबंधी एक रंगीत चित्रपट तयार केला आहे. चंदीगड येथील योगशिक्षण संस्थेला त्यांनी भेट दिली. त्याचप्रमाणे मुंबई येथील मेडिकल सेंटर व इतर काही संबंधित संस्थांनाही भेटी दिल्या. रशिअन चित्रपटाचे निर्माते ए. सेरेब्रेनिकॉव्ह ह्यांनी चित्रपट घेण्यातील आपला हेतू स्पष्ट केला आहे. योगविद्येबाबत जे रहस्यमय आणि दैवी वातावरण निर्माण केले जाते त्याचा निरास करण्याच्या हेतूने हा चित्रपट काढण्यात आला आहे असे त्यांनी सांगितले. चित्रपटात आरोग्य राखण्याच्या ह्या प्राचीन व्यायामपद्धतीचा प्रेक्षकांना सुबोध परिचय करून देण्यात आलेला आहे. रशिआत यौगिक व्यायामपद्धतीसंबंधी अलीकडे आस्था उत्पन्न होऊ लागली आहे. चित्रपटात पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचे योगासंबंधीचे मत गोवण्यात आले आहे. ते म्हणतात की मन व शरीर ह्यांना शिस्त लावण्याचे हे तंत्र असून त्यात भारतीयांची बुद्धिमत्ता दिसून येते. योगविद्येसंबंधी त्यांनी केलेली निरीक्षणे व प्रयोग मागच्या पिढ्यांनी पुढच्या पिढ्यांच्या हवाली केलेले आहेत. ह्या चित्रपटापैकी काही भाग बल्गेरिआत, काही मॉस्को येथे आणि काही किएव्ह येथे चित्रित करण्यात आलेला आहे. चित्रपट लवकरच रशिआतील चित्रपटगृहांतून दाखविण्यात येणार आहे. योगविद्येसंबंधी शास्त्रीय विचार व संशोधन पाश्चात्य देशांत ह्यापूर्वीच सुरू झालेले आहे. आता रशिआही त्यात सामील झाला आहे.

---

## रोगचिकित्सेत उपकरणांना फाजील महत्त्व

असोसिएशन ऑफ फिजिशिअन्स ऑफ इंडिआ ह्या संघटनेची २६ वी वार्षिक परिषद मंगलोर येथे भरली होती. परिषदेच्या उद्घाटनाच्या भाषणात भारत सरकारचे आरोग्यमंत्री श्री. के. के. शहा ह्यांनी डॉक्टर मंडळींना उद्देशून काही परखड उद्गार काढले. ते म्हणाले की रोगाची चिकित्सा करताना डॉक्टर लोक यांत्रिक साधनांवर वाजवीपेक्षा अधिक भार टाकू लागले आहेत. ह्याचा एक परिणाम असा होतो की रोग्याकडे हाडामासाची व्यक्ती म्हणून पाहाण्याची वृत्ती कमजोर होते आणि रोग्यांकडे केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची वृत्ती बळावते. सुमारे तीस-चाळीस वर्षांपूर्वीचे डॉक्टर स्वतःच्या निरीक्षणावर आणि रोग्यांच्या तपासणीवर अधिक भर देत असत. आज मात्र रोगनिदानाच्या आधुनिक साधनांवर अवलंबून राहण्याची प्रथा रूढ झालेली दिसत आहे. त्यामुळे पुष्कळदा अशी टीका करण्यात येते की हल्लीचे डॉक्टर रोग तपासतात, रोगी तपासत नाहीत. अलीकडे रोग्यांची तपासणी बहुधा क्ष-किरणांच्या अंधाऱ्या खोलीत अगर दुर्दैवाने तो मृत झाल्यास रोगनिदान करणाऱ्या डॉक्टरांकडून होते. ह्याचा अर्थ असा की रोग्याच्या तपासणीची जागा रोगनिदानाच्या प्रयोगशाळेने घेतलेली असून उपचाराचे काम औषधे तयार करणाऱ्या कंपन्यांकडे गेलेले आहे. ही परिस्थिती देशाच्या दृष्टीने अतिशय नुकसानकारक आहे. ह्या बाबतीत आयुर्वेदीय डॉक्टर हा ॲलोपॅथीच्या डॉक्टरांपेक्षा अधिक सु रलेला म्हणावयास हवा. कारण तो औषधयोजनेबरोबरच रोग्याच्या मनालाही योग्य ते महत्त्व देतो. इस्पितळातील रोग्यांची देखभाल करतानाही एक प्रकारचा व्यक्तिनिरपेक्ष दृष्टिकोन तेथील नोकर व डॉक्टर ह्यांच्या वागणुकीत दिसून येतो.

---

## कागदी साड्याही लोकप्रिय

हिंदी स्त्रियांच्या वेषभूषेतील साडी सर्व जगभर लोकप्रिय झालेली आहे. कोणत्याही परदेशीय स्त्रीला ह्या साडीबद्दल कुतूहल तर वाटतेच वाटते. बनारसी अगर कांजीवरम् येथे तयार होणाऱ्या भारी किमतीच्या साड्यांनी स्त्रियांना वेड लावावे ह्यात आश्चर्य नाही. पण कागदी साड्याही तितक्याच मोहमयी ठरल्या आहेत. एअर इंडिआने भारत सरकारच्या परदेश-प्रवासी कचेऱ्यांत अशा आकर्षक कागदी साड्या पाठविल्या होत्या. टोकिओ येथील प्रवास-कचेरीने ही कागदी साडी नेसवून एका जपानी युवतीचे छायाचित्र घेतले आणि ते वृत्तपत्राकडे प्रसिद्धीसाठी पाठविले. भारतात जाऊ इच्छिणाऱ्या ५० जपानी स्त्रियांना ही साडी मोफत देण्यात येईल असेही जाहीर करण्यात आले; आणि मग प्रवासी कचेरीकडे १० हजार जपानी स्त्रियांनी भारतात जाण्याचा आपला मनोदय कळविला. अखेर चिठ्ठ्या टाकून त्यांची निवड करण्याचे ठरले.

---

## पाकिस्तानात शिकलेल्या स्त्रियांची वाढती संख्या

पाकिस्तानातील नव्या सुशिक्षितांच्या पिढीत शिकलेल्या स्त्रियांची संख्या वाढत चाललेली आहे. पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांत ६५ टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रिया असतात. कायदा व व्यापार ह्या विषयांचे शिक्षण घेणाऱ्या तरुणी मोठ्या प्रमाणावर आहेत. त्याचप्रमाणे वैद्यक शिकणाऱ्या आणि शिक्षक अगर प्राध्यापक होऊ इच्छिणाऱ्या स्त्रियाही काही कमी नाहीत. अलीकडे सरकारी कचेऱ्या आणि खाजगी कंपन्यांच्या कचेऱ्या ह्यांतून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या जोराने वाढू लागली आहे. कचेऱ्यांतून वरिष्ठ जागांवर काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ७० हजारांइतकी झाली आहे. त्याशिवाय मॅजिस्ट्रेट, वकील, शिल्पज्ञ, लेखक, एंजिनिअर, बँका व विमा कंपन्यांतील अधिकारी, इत्यादी जागांवरही त्या काम करीत आहेत. नोकरी करणाऱ्या पाकिस्तानी स्त्रियांपैकी ७३ टक्के अविवाहित आहेत. कारण त्यांना नोकरीत हुद्देदार व्हावयाचे आहे.

---

## 'भारतमित्रा'चा संदेश—धैर्य हाच सोबती

पोर्तुगीज अमलाखालील गोव्यात हिंदू संस्कृतीची आणि मराठी भाषेची गळचेपी होत असताना, 'भारतमित्र' ह्या रिवण (गोवा) येथे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाने अनेक आपत्तींना तोंड देऊन गेली ४२ वर्षे तेथील मराठी माणसांची शान कायम राखली आहे. 'भारतमित्रा'चे संपादक श्री. ना. भा. नायक ह्यांना त्यासाठी अनेक शिक्षा भोगाव्या लागल्या आहेत. गोव्यातील जुन्या सुमारे ५० नियतकालिकांपैकी हेच फक्त टिकून राहिले आहे. त्याचे सर्व श्रेय श्री. नायक ह्यांच्या ध्येयवादाला आणि चिकाटीला आहे. आज त्यांची सत्तरी उलटली असली आणि नुकतीच त्यांच्यावर कौटुंबिक आपत्ती ओढवली असली, तरी त्यांनी आपला धीर खचू दिलेला नाही. अशा ह्या 'भारतमित्रा'स आम्ही आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य चिंतितो. जानेवारीच्या, ४३ व्या वर्षाच्या प्रारंभीच्या अंकात श्री. ना. ह. आपटे ह्यांनी आपल्या लेखात म्हटले आहे, "व्यवहार, धक्के, कौटुंबिक आपत्ती, आरोग्याची हानी, परिस्थितीचे जाच, किंवा वाच्यता न करता येणारे कोणतेही त्रास सहन करावे लागले, तरी कधीच धैर्य सोडू नये. या एकाच सोबत्यावर आपले जीवन पूर्णांशाने अवलंबून आहे." श्री. ना. भा. नायक ह्यांच्या जीवनाचे हेच रहस्य आहे.

'भारतमित्रा'च्या प्रत्येक अंकाच्या पहिल्या पानावर सुमारे २० छोटी सुभाषिते दिलेली असतात. इतर कुठल्याच मासिकात अशी सुभाषिते आढळत नाहीत. हे एकच वैशिष्ट्य संपादकांचे ध्येयवादित्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे.

---

**हिंदुस्थान स्टीलला पुन: तोटा**—दुर्गापूर, राऊरकेला आणि भिलई पोलाद कारखान्यांची हिंदुस्तान स्टील ही सरकारी कंपनी सालोसाल तोट्यात चालू आहे. चालू आर्थिक वर्षी तिला १४ कोटी रु. नुकसान येण्याचा संभव आहे. गेल्या वर्षी १०·४ कोटी रु. नुकसान आले होते. त्यापूर्वीच्या वर्षी ४० कोटी रु. नुकसान आले होते, म्हणून सरकारने दर टनास ७५ रु. एवढी किंमत वाढवून दिली तरी नुकसान येतच आहे. दुर्गापूर येथील कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १६ लक्ष टन आहे, परंतु उत्पादन ८ लक्ष टनांच्या आसपास आहे. राऊरकेलाची उत्पादनक्षमता १८ लक्ष टन आणि प्रत्यक्ष उत्पादन १० लक्ष टनांच्या आसपास आहे. भिलईचे उत्पादन उत्पादनक्षमतेइतके, सुमारे २५ लक्ष, टन होते.

**क्यूबामध्ये धूम्रपानाविरुद्ध मोहीम**— क्यूबा त्याच्या तंबाखूसाठी आणि सिगार्ससाठी सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या निर्गतीसाठी अंतर्गत खप कमी करण्याचे क्यूबाच्या सरकारने ठरविले आहे. तेथील लोकांना दर आठवड्यास फक्त दोन सिगार्स किंवा सिगारेट्सची दोन पाकिटे ह्यापुढे मिळू शकतील.

---




■ LESS FUEL CONSUMPTION
■ GETS HEATED EQUALLY FROM ALL SIDES
■ LIGHT WEIGHT ■ NON RUSTABLE
■ RETURN VALUE 35% LESS.

Mfgd. by
VARSHA INDUSTRIES
64/23, ERANDWANA, LAW COLLEGE RD POONA 4
PHONE 55435

महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा

आपल्या ५० शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

ठेवी : १४ कोटींचे वर

खेळते भांडवल : १४·५० कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले
बी. ए., एम्. कॉम्., एल्‌एल्. बी., ए. आयु. आयु. बी. चेअरमन

# श्री. आ. रा. भट, एम्. कॉम्.

## ह्यांच्या तपश्चर्येचा गौरव

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या स्थापनेत पुढाकार घेऊन आणि चेंबरच्या पुरस्काराने 'बँक ऑफ महाराष्ट्र' च्या उभारणीची योजना यशस्वी करून श्री. आत्माराम रावजी भट, एम. कॉम. ह्यांनी महाराष्ट्रात उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी भरीव कामगिरी केली आहे. लघु उद्योगांचे संवर्धन, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी हे सर्व कार्य महाराष्ट्राच्या विकासाबद्दलच्या तळमळीने केले; कोठल्याही संस्थेत त्यांनी स्वत:करिता नफ्याचे स्थान घेतले नाही की कुठल्याही कंपनीचे ते संचालक किंवा अध्यक्ष झाले नाहीत. मराठा चेंबरचे आजही ते ऑनररी सेक्रेटरी आहेत; म्हणजे मानसन्मानापेक्षा कृतीला ते महत्त्व देतात. त्यांच्या संघटना-चातुर्याचा सर्व लाभ त्यांनी इतरांना मिळवून दिला. भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन त्यांचा गौरव केला, ह्याबद्दल आम्ही त्यांच्यापेक्षा भारत सरकारचेच अभिनंदन करतो. कारण, श्री. भट ह्यांनी स्वत:च्या संग्राहक वृत्तीने आणि कार्यक्षमतेने उद्योगपती निर्माण होण्यास हातभार लावला आहे. औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रांत वावरूनही ते स्वत: त्याचेपासून अलिप्त राहिले आहेत. त्यांना आम्ही आरोग्यप्रद दीर्घायुष्य चिंतितो.



---

## सार्वत्रिक निवडणुकीसाठी १० हजार जीपगाड्या

लोकसभेच्या आणि तामीलनाडू व पश्चिम बंगालमधील सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी प्रचारासाठी वाहतुकीचे साधन म्हणून निरनिराळे राजकीय पक्ष किमान १० हजार जीपगाड्यांचा वापर करतील असा अंदाज आहे. ह्यांपैकी बऱ्याच गाड्या राजकीय पक्षांना व्यापाऱ्यांकडून अगर खाजगी मालकाकडून मिळवाव्या लागणार आहेत. परंतु पुष्कळशा गाड्या संरक्षण खात्याच्या विक्री विभागाकडूनही मिळण्याची शक्यता आहे. मुंबईमधील खाजगी मालकीच्या एकमेव कारखान्याने १,८०० जीपगाड्या राजकीय पक्षांना विकण्याचा परवाना मिळविला आहे. ह्या गाड्या मुळात संरक्षणखाते व इतर सरकारी खाती ह्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या. गाड्यांची विक्री खुद्द राजकीय पक्षांना अगर उमेदवारांनाच करण्यात येणार असल्याने त्यांना व्यापाऱ्याचे कमिशन द्यावे लागणार नाही. त्यामुळे किमतीत ४ टक्के घट होईल. बहुतेक जीपगाड्या संरक्षणखात्यामार्फत विकल्या जातील. संरक्षणखाते दरसाल ६ ते ७ हजार गाड्या खुला लिलाव करून विकत असते. व्यापारी ह्या गाड्या विकत घेतात आणि ठीकठाक करून जास्त किमतीला लोकांना विकतात. एका जीपगाडीची किंमत तिची बनावट, नमुना आणि प्रकार ह्यांच्या अनुरोधाने ९,७०० रुपयांपासून ४,२५० रुपयांपर्यंत असते. परंतु सरकारला गाड्या ह्या ठराविक किमतीपेक्षा २० टक्के कमी किंमत घेऊन विकण्याची मुभा असते. मात्र किंमत ठरविताना विक्रीच्या मागील तीन वर्षे चालू असलेल्या किमतीची सरासरी विचारात घेऊन मगच गाड्यांची विक्री करता येते.

---

## हिंदमधील शेती क्रांतीच्या उंबरठ्यावर

दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या आशिआ-पसिफिक अन्न-उत्पादन परिषदेचा समारोप करताना इंडिअन ॲग्रिकल्चरल रीसर्च इन्स्टिटयूटचे संचालक डॉ. एम्. एस्. स्वामीनाथन् ह्यांनी भारतामधील शेती-व्यवसायाच्या भवितव्याबद्दल आत्मविश्वासपूर्व आणि आशादायक अभिप्राय व्यक्त केला आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले की शेतमालापैकी अनेक प्रकारच्या उत्पादनाच्या बाबतीत भारत आज क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. तांदूळ आणि कापूस ह्यांचाही क्रांतीच्या ह्या चाहुलीत समावेश आहे. परिषदेला हजर राहण्यासाठी ४० देशांचे प्रतिनिधी आले होते. त्यांच्यासमोर बोलताना ते पुढे म्हणाले की शेतीच्या उत्पादनात फार मोठी क्रांती घडवून आणण्याचे तंत्र उपलब्ध झालेले असून त्याचा वापर करण्यासाठी लागणारी अवजारे आणि इतर साधने भारतापाशी आहेत. त्याचप्रमाणे जरूर ती कार्यक्षमताही आहे. पिके घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जुन्या बी-बियाणांची जागा नव्या प्रकारची बी-बियाणे घेऊ शकतील. या नव्या जाती पिके सुगीला येण्याच्या काळाच्या दृष्टीने आणि दिलेल्या पाण्याचा चांगला उपयोग करून घेण्याच्या बाबतीत उत्कृष्ट ठरलेली आहेत. भारताच्या अन्नधान्य उत्पादन निर्माण करण्याच्या क्षमतेबद्दल काही तज्ज्ञांनी निराशा व्यक्त केलेली आहे. परंतु तिला जागा नाही. देशाच्या वाढत्या लोकसंख्येला पुरे पडेल इतके धान्य निर्माण करण्यास भारत समर्थ आहे. प्रथिनांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे लहान मुलांची वाढ खुंटते. कमी पडणारे प्रथिनयुक्त अन्नपदार्थ निर्माण करण्याचे तंत्र व शास्त्रही भारताने आत्मसात् केलेले आहे.

---

# ग्रंथ-मुद्रणाचा दर्जा का खालावला ?

## निर्मिति खर्चाच्या चार ते पाच पट किमती ठेवल्या, तर उत्कृष्ट ग्रंथांचे प्रकाशन फायदेशीर ठरू शकेल.

[ 'मौज' प्रकाशन व मौज प्रिंटिंग ब्युरोचे श्री. वि. पु. भागवत यांच्या प्रस्तुत लेखातून व्यावसायिक अडचणींची व्यावहारिक बाजू समजून येईल. ]

कोणतेही काम चांगल्या प्रकारे करावयाचे तर त्या कामात यथायोग्य मोबदला मिळण्याचे आकर्षण असावे लागते. तसेच नवी नवी तंत्रे त्या क्षेत्रात उपलब्ध करून द्यावयाची असतील तर त्यासाठी करावा लागणारा भांडवली खर्च करणे शक्य होईल अशा योग्य आर्थिक पातळीवर तो उत्पादनक्षम राहील याची खात्री असावी लागते. भारतीय मुद्रणात गेल्या १०–१५ वर्षांत झपाट्याने सुधारणा झालेली आहे हे खरे; परंतु ती सुधारणा फक्त प्रसिद्धी व व्यापारी मुद्रणाच्या बाबतीत झालेली आहे हे डोळया-आड करून चालणार नाही.

सरकारी नियंत्रणाची संरक्षक छत्री डोक्यावर, त्यामुळे कामाचा मनपसंत दर आणि ग्राहकाची थोडा कमी-जास्त खर्च झाला तरी चांगले काम करून घेण्याची प्रवृत्ती, यांमुळे व्यापारी मुद्रणाचा दर्जा गेल्या १५।२० वर्षांत झपाट्याने सुधारत गेला. या उलट, आपण मुद्रकाला काम देतो हाच त्याच्यावर उपकार करतो; त्याला त्याच्या कामाचा योग्य मोबदला दिला पाहिजे आणि तो वेळेवर दिला पाहिजे याचे आपणावर कोणतेच बंधन नाही; मुद्रकाने काम पुरे होताच किंवा काही ठराविक काळ लोटल्यानंतर आपला मोबदला मागितला तर त्याने तो गुन्हाच केला; काम कम–दर्जाचे झाले तरी चालेल पण मुद्रणाचा खर्च जितका कमी होईल तितके चांगले, अशी सर्वसाधारण वृत्ती; या सा-यांचे अनिष्ट एकत्रीकरण ग्रंथ-मुद्रण ग्राहकांमध्ये झाल्यामुळे मुद्रणाच्या या विभागाची प्रगती झाली नाही. उलट, दर्जा खालावला. व्यापरी मुद्रण क्षेत्रात ग्राहकाने चागल्या मुद्रणालयाचे तांत्रिक ज्ञान स्वतःपाशी उपलब्ध करून घेतले. ग्रंथ–मुद्रण करून घेणाऱ्या किती व्यक्तींजवळ असे तांत्रिक ज्ञान होते किंवा आहे ?

ग्रंथ-प्रकाशन हा प्रकाशक व मुद्रक यांच्या सहकार्याने होणारा व्यवसाय आहे. अशा परस्परावलंबी व्यवसायात वस्तूचे वितरण करणारा, वस्तूची निर्मिती करणऱ्या संस्थेचे आरोग्य ठीक राहण्यासाठी सदैव झटत असतो. इतकेच नव्हे तर त्याच्या स्थापनेसाठी व संवर्धनासाठी हातभार लावीत असतो. पण असे काही प्रयत्न ग्रंथ-मुद्रण करणारे मुद्रक आणि त्यांच्याशी व्यवहार करणारे प्रकाशक यांमध्ये झाले असल्याची फारशी उदाहरणे नाहीत. उलट, हे दोन्ही व्यवसाय एका नियंत्रणाखाली असले तरीही प्रकाशन विभागाने मुद्रण विभागाची गळचेपीच केल्याची काही उदाहरणे आहेत. तेव्हा कोणत्याच दृष्टीने समाधानकारक परिस्थिती नसलेल्या ग्रंथ-मुद्रकाचे आपल्या कामाकडे नीट लक्ष राहिले नाही आणि त्यामुळे कामाचा दर्जा खालावत गेला तर तो दोषास सर्वस्वी पात्र आहे असे कोणी समतोल वृत्तीचा मुद्रक-प्रकाशक म्हणू शकेल असे वाटत नाही.

चांगल्या दर्जाचे प्रकाशन करावयाचे म्हणजे त्यावर अधिक खर्च करावा लागतो आणि तो तसा केला तर त्याची परतफेड होऊन प्रकाशकाला त्याच्या श्रमाचा योग्य तो मोबदला मिळण्यासाठी पुस्तकाच्या विक्रीची किंमत ठरवावी लागते. आज मराठीमध्ये पाठ्या-पुस्तके सोडून ललित व इतर ग्रंथ तसेच बालवाङ्मय यांच्या विक्रीची किंमत दर प्रतीमागे येणाऱ्या निर्मिति-खर्चाच्या (ज्यामध्ये मुद्रणाचा खर्च, कागदाचा खर्च व बांधणीचा खर्च तसेच चित्रकार, ठसे वगैरे बाह्यांगाशी संबंधित असलेल्या खर्चाचा समावेश होतो.) २॥ ते ३॥ पट ठेवली जाते. या किमतीमध्ये पुस्तक-विक्रेत्याला दिले जाणारे २५ ते ३० टक्के कमिशन व १० ते १५ टक्के लेखकाचा मोबदला यांचा समावेश असतो. परंतु एकंदर ग्रंथ-विक्रीला लागणारा दीर्घ कालावधी व त्यात गुंतलेली रक्कम वसूल होईपर्यंत त्यावर चढणारे व्याज आणि सर्व प्रती खपेपर्यंत त्याची करावी लागणारी देखभाल व त्यावर होणारा खर्च याचा फारसा विचार केला जात नाही. तसा तो करणे आवश्यक आहे आणि तसा तो केला तर ग्रंथ-विक्रीच्या किमतीचे निर्मिति-खर्चाशी आज असलेले प्रमाण वाढवावे लागेल. पुढारलेल्या देशात किंमत ठेवली जाते, त्याप्रमाणे निर्मिति-खर्चाच्या साधारणपणे चार ते पाच पट किंमत ठेवली तरच अशा प्रकारचे ग्रंथ-प्रकाशन फायदेशीर ठरू शकेल. आणि येथेच या व्यवसायातील सर्व प्रश्नांची मेख आहे.

आज पुस्तकांच्या किमती युद्धपूर्व किमतीच्या साधारण तिप्पट ते चौपट झालेल्या आहेत. पण इतर वस्तूंच्या किमतीत ही वाढ सहा ते सात पटीने झालेली आहे. त्याच प्रमाणात पुस्तकांच्या किमती वाढल्या तर ग्रंथव्यवसायाचे सर्वच अर्थकारण सुधारेल आणि अधिक चांगली पुस्तके ग्राहकांना मिळू लागतील. परंतु पुस्तकाची वाढती किंमत देण्याला ग्राहकाचा मानसिक विरोध आहे. त्याच्या करमणुकीचा इतर साधनांची वाढलेली किंमत तो न कुरकुरता देतो; पण पुस्तकाची किंमत देताना मात्र खळखळ करतो. पुस्तकाबाबतची समाजाची ही वृत्ती बदलल्याशिवाय ही परिस्थिती सुधारणार नाही आणि तोपर्यंत तरी बाह्यांगाबाबत कसदार व गुणवत्तापूर्ण पुस्तके देणे दिवसेंदिवस अशक्य होणार आहे.

सामाजिक जीवनात व सांस्कृतिक विकासात वाङ्मयाचे जे स्थान आहे त्याची खरीखुरी जाणीव सर्वांना झाल्याशिवाय हे घडणे शक्य नाही. आणि तोपर्यंत वाढत्या किमतीबाबत ग्राहकाच्या वृत्तीशी जुळवून मिळवून घेण्यासाठी पुस्तकांच्या निर्मिति-मूल्यांबाबत तडजोड करण्याशिवाय प्रकाशकासमोर दुसरा मार्ग नाही.

—बालसाहित्य जत्रा, डिसेंबर १९७०

# पुणे जिल्ह्याच्या विकासाच्या प्रगतीचे दशक

पुणे जिल्ह्याच्या प्रगतीचे हे दशक शेती, उद्योगधंदे, सहकार लोकजीवन समृद्ध करणाऱ्या इतर अनेक क्षेत्रांत केलेल्या रीव कार्याची तेजस्वी कहाणी सांगते. गेल्या दशकात ‌विकासाच्या सर्व योजनांवर जिल्हा स्तरावर साडेपंचवीस कोटी पये प्रत्यक्ष खर्च झाले आहेत. त्याचे दृष्य फलही या भागाचा ायापालट झाल्यामुळे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

## कृषिविकास

नियोजनपूर्व काळात ह्या जिल्ह्यात १·९५ लाख टन अन्नधान्याचे उत्पादन होत असे, आज ते ३ लाख टनांपर्यंत गेले आहे. ह्याचे श्रेय अधिक उत्पन्न देणाऱ्या संकरित पिकांच्या कार्यक्रमाला आहे. १९६९–७० साली हा कार्यक्रम ४२,५०० हेक्टर क्षेत्रात कार्यान्वित करण्यात आला. ज्वारी, भात, तायचूंग आय. आर. आठ, गहू इत्यादींची उद्दिष्टे ओलांडण्यात जिल्ह्याने यश मिळविले आहे. उत्पादनवाढीच्या कार्यक्रमासाठी प्रत्येकी १०,००० हेक्टर क्षेत्रात आतापर्यंत १२ सधन शेतीगटही जिल्ह्यात स्थापन करण्यात आले. १९६९–७० साली ५३,१३४ टन रासायनिक व मिश्र खतांचा पुरवठा शेतकऱ्यांना करण्यात आला. पीक-संरक्षणासाठी ग्रामपंचायती व सहकारी सोसायट्या ह्यांना ४७० डस्टर्स व ९२४ स्प्रेअर्स पुरविण्यात आले. सामूहिक कृषी प्रशिक्षण योजनेनुसार आतापर्यंत १०० वर्गांतून ५,२४४ शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आज जिल्ह्यात १३ बीजगुणन केंद्रे व ५६ बीजग्रामे आहेत. जमीनसुधारणेसाठी ३,६८,००० हेक्टर क्षेत्रात बांध-बंधिस्ती व ९,००० हेक्टर टेरेसिंग करण्यात आले. योजनापूर्व काळात बांध-बंधिस्तीचे कार्य केवळ १,७२६ हेक्टर क्षेत्रात झाले होते. ह्या पार्श्वभूमीवर गेल्या १० वर्षांत झालेल्या कार्याची निश्चित कल्पना येऊ शकेल. जिल्ह्यातील जमीन एकत्रीकरणाचे २५ टक्के कार्य पूर्ण झाले आहे.

## जलसिंचन

गेल्या १० वर्षांत घोड, पानशेत, भीमा, वीर अशा मोठ्या व अनेक छोट्या पाटबंधारे योजनांमुळे १०,८,८०० हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. कुकडी प्रकल्पामुळे आणखी ३२,८०० हेक्टर जमीन देखील ओलिताखाली येईल. पाटबंधाऱ्याच्या मोठ्या योजनांपैकी वीर व घोड हे प्रकल्प पूर्ण झाले असून पानशेत, भीमा, घोड व वीर ह्या चारही प्रकल्पांत मिळून सुमारे १०० टी. एम्. सी. पेक्षा जास्त पाणी शेतीसाठी उपलब्ध होत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २१० वसंत बंधारे बांधण्यात आले असून, २८३ उपसा जलसिंचन योजना हाती घेण्यात आल्या आहेत. ह्याचबरोबर ३,७६० ऑईल इंजिन्स शेतकऱ्यांना वाटण्यात आली आहेत. ह्या सर्व प्रयत्नांमुळे बागायतीच्या क्षेत्रात १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली.

## उद्योग व वीज

१९६१ साली जिल्ह्यात फक्त ७१६ कारखाने होते व त्यांतून २५ ते ३० हजार लोकांना कामधंदा मिळत होता. आज छोट्या-मोठ्या कारखान्यांची संख्या ३,००० झाली असून त्यांतून सुमारे १ लाख लोकांना काम मिळेल. फक्त मोठ्या कारखान्यांची संख्या आज जवळ जवळ १२५ आहे. जिल्ह्यात ६ औद्योगिक वसाहती असून त्यांपैकी पुणे शहराजवळ ४ व लोणावळा आणि बारामती येथे प्रत्येकी एक वसाहत आहे. १९६१ साली जिल्ह्यातील फक्त १६ गावांना वीजपुरवठा होत असे. आज ५८० गावांचे विद्युतीकरण झाले आहे. विद्युतीकरणाचे हे प्रमाण ३८ टक्के असून, एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकांना त्याचा फायदा मिळतो. मार्च १९७० अखेर जिल्ह्यातील विजेच्या पंपांची संख्या १०,८८८ होती. जवळ जवळ २० टक्के विहिरींवर विजेचे पंप बसविण्यात आले आहेत. कृषी वीज महामंडळाच्या आर्थिक साहाय्याने शेतकऱ्यांना वीजपंपांच्या पुरवठ्यासाठी ७६·६० लाख रुप खर्च करण्यात आला.

## सहकार-प्रगती

जिल्ह्यातील १०० टक्के खेडी सहकारी क्षेत्राखाली असून, सहकारी संस्थांची संख्या आज २,४१९ इतकी आहे. १९६० साली हीच संख्या १,१७८ एवढी होती. सभासदांच्या संख्येत तर गेल्या १० वर्षांत पाच पटींहून अधिक वाढ झाली आहे. १९६९-७० साली सहकारी संस्थांमार्फत २,४२,८५४ रुपये कर्जरूपाने वाटण्यात आले, त्यांपैकी ५० टक्क्यांहून अधिक म्हणजे १,३४,६९४ रुपये वसूल झाले. १९६० साली जिल्ह्यात दोन सहकारी साखरकारखाने होते. त्यांची संख्या आज दुप्पट झाली असून, सभासदांची संख्या आज सुमारे १८ हजार आहे.

## रस्ते व वाहतूक

१९६१–६२ साली जिल्ह्यातील २१२ मार्गांवरून राज्य परिवहन मंडळाच्या बसेस धावत होत्या. आज १९६९–७० साली अशा मार्गांची संख्या ३१६ झाली आहे. त्याचप्रमाणे पूर्वी रोज सुटणाऱ्या २१५ गाड्यांची संख्या आता ३२७ पर्यंत गेली आहे. प्रवाशांच्या संख्येतही १० वर्षांत जवळजवळ दुपटीने वाढ झाली आहे. १९६१ मध्ये जिल्ह्यात २,६२५ किलोमीटर लांबीचे रस्ते होते, त्यांची संख्या आज ५,४६२ किलोमीटर एवढी झाली आहे.

# यशोसिद्धीची दहा वर्षे

अवर्षण, पूर, भूकंप, परकीय आक्रमण ह्यांसारख्या अनेक नैसर्गिक व राष्ट्रीय आपत्तींना तोंड देऊन पुणे जिल्ह्याने गेल्या दहा वर्षांत विकासाच्या सर्वच क्षेत्रांत सातत्यपूर्ण व नेत्रदीपक प्रगती केली. पुढील बोलके आकडे ह्याची निखालस साक्ष देतील.

- नियोजनपूर्व काळात जिल्ह्यातील अन्नधान्याचे उत्पादन १·९५ लक्ष टन होते ते आता ३ लक्ष टनांहून अधिक झाले आहे.
- समपातळी बांध घालण्याच्या कार्यात तर जिल्ह्याने गरूडभरारी मारली आहे. योजनापूर्व काळातील १७३६ हेक्टर क्षेत्रांवरून ही संख्या आज ३,६८,००० हेक्टरवर गेली आहे. ९,००० हेक्टर जमिनीचे टेरेसिंग झाले असून जमीन एकत्रीकरणाचे कार्य २५% पूर्ण झाले आहे.
- एकूण १,०८,८०० हेक्टर जमीन ओलिताखाली असून कुकडी प्रकल्पामुळे आणखी ३२,८०० हेक्टर जमीन पाण्याखाली येईल. ह्या प्रयत्नामुळे दहा वर्षांत बागायत क्षेत्रात १५ टक्के वाढ झाली आहे.
- १९६१ मध्ये फक्त २६ गावांना वीजपुरवठा होता. आज ५८० गावांचे विद्युतीकरण झाले आहे. मार्च १९७० अखेर जिल्ह्यातील विजेच्या पंपांची संख्या १०,८८० असून २० टक्के विहिरींवर विजेचे पंप बसविण्यात आले आहेत.
- १९६१–६२ साली वनउत्पादन २·९५ लाख रुपयांचे होते ते १९६९–७० साली ४·७९ लाख रुपयांचे झाले.
- छोट्या मोठया उद्योगांची संख्या आज ३,००० असून त्यातून सुमारे १ लक्ष लोक काम करतात. जिल्ह्यांत ६ औद्योगिक वसाहती व ४ सहकारी साखरकारखाने आहेत. शासनाने एक कुक्कुट संस्करण कारखानाही उभारला असून त्यात रोज ८,००० कोंबड्या कापून विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातात.

## प्रगतीपथावरील निश्चयी वाटचाल

- १९६० साली १·६० लाख सभासद असलेल्या ११७८ सहकारी संस्था होत्या. आज २४१९ संस्था असून त्यांची सभासद संख्या ८·३१ लाख आहे. जिल्ह्यातील सर्व खेडी सहकारी क्षेत्रात आली आहेत.
- रस्त्यांची लांबी गेल्या वर्षात २६२५ किलोमीटरवरून ५४६२ किलोमीटरपर्यन्त वाढली आहे. परिवहनमार्गही २१२ हून ३१६ झाले असून त्यावरून रोज धावणाऱ्या एस. टी. गाड्यांच्या संख्येत २१५ हून ३२७ पर्यन्त वाढ झाली.
- गेल्या दहा वर्षांत प्राथमिक शाळांच्या संख्येत दीडपट व माध्यमिक शाळांमध्ये दुप्पट वाढ झाली असून उच्च शिक्षणसंस्थांची संख्या २० वरून ३५ झाली आहे. मार्च १९७० अखेर संपूर्ण जिल्हा साक्षर झाला आहे.
- रुग्णालयांची संख्या दहा वर्षांत २० हून २५ झाली आहे. १९६६ साली ४५१४ संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया झाल्या होत्या. १९७० साली १५,७८८ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. डॉक्टरांच्या संख्येतही ३४१ वरून ४२६ पर्यन्त वाढ करण्यात आली.
- १९६१ साली दूध उत्पादक सहकारी संघटनेमार्फत ३०,००० लिटर दूध गोळा केले जाई. आज ५०,००० लिटर दूध गोळा करण्यात येते. शासकीय दूध योजनेमार्फत शहराला दररोज करण्यात येणाऱ्या दुधाच्या पुरवठ्यातही १२,७०० लिटरवरून ५० हजार लिटरपर्यंत वाढ झाली आहे.
- सामूहिक विकास कार्यक्रमावर गेल्या दहा वर्षांत २·३१ कोटी रुपये खर्च झाले आहेत.
- १७७६ भूमिहीनांना आतापर्यंत मोफत ५६८३ हेक्टर जमीन वाटण्यात आली आहे.
- १९६० साली २५० रेडिओ सेट होते. आज त्यांची संख्या १६४७ असून जिल्ह्यातील ९२ टक्के गावे व ९६·५ टक्के लोकसंख्या ग्रामीण ध्वनिक्षेपण योजनेखाली आली आहे. ह्या बाबतीत जिल्ह्याने संपूर्ण महाराष्ट्रात पहिला क्रमांक पटकावला आहे. नभोवाणी शेतकरी मंडळांची संख्या १३६ असून त्यामुळे हरितक्रांतीला मोठी चालना मिळत आहे.

**पुणे जिल्हा**

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी

दूरध्वनी

मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६

# दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक






हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)